महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११३/प्र.क्र.१३/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
तारीख: ३० जानेवारी, २०१४

वाचा -

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ (८५/१३)/माशि-१, दिनांक १५ जून, २०१३
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ (८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

प्रस्तावना -

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अनुक्रमांक (१) येथील शासननिर्णयान्वये २४१७ संस्था पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तसेच अनुक्रमांक (२) येथील शासननिर्णयान्वये एकंदर ८२८ एवढ्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/ माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झालेल्या नव्हत्या. तसेच, अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय -

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता सोबत जोडलेल्या सहपत्रांनुसार प्रस्तावांमध्ये दुरुस्ती /सुधारणा करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१३ आणि दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ मधील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२०३१६०८१३७९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.02.03 17:01:47 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी. गोंदिया/पुणे/गडचिरोली/ बुलढाणा/औरंगाबाद/ नागपूर/ सोलापूर
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १/२, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १/२, मुंबई/नागपूर
९. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/नागपूर/पुणे/अमरावती/औरंगाबाद
१०. शिक्षण निरीक्षक (पश्चिम), बृहन्मुंबई
११. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया/पुणे/गडचिरोली/ बुलढाणा/औरंगाबाद/नागपूर/सोलापूर .
१२. वित्त विभाग (कार्यासन- व्यय-५), मंत्रालय, मुंबई-३२
१३. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४. मा. मंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
१५. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
१६. मा. मुख्य सचिव ( शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सहसचिव/उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवडनस्ती (एसएम-२)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव/ प्रस्तावित ठिकाण | दि.१५ जून, २०१३/ दि.५ ऑक्टोबर, २०१३ नुसार देण्यात आलेली परवानगी | संस्थेच्या मूळ प्रस्तावातील मागणीनुसार देण्यात आलेली परवानगी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ११. | जेनेसिस एज्युकेशन सोसायटी, लुल्लानगर, कोंढवा, पुणे | द.लेक्सिकॉन स्कूल, फुरसुंगी, सासवड रोड, पुणे | अपात्र | **पात्र.**<br>संस्थेच्या नावे १ एकरपेक्षा अधिक जागा आहे.<br>**माध्यम- इंग्रजी**<br>**नवी शाळा**<br>**प्राथमिक** |
| १२. | महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे | विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, सोलापूर | माईर्स एम.आय.टी. कॉलेज, पुणे संचलित विश्वशांती गुरुकूल स्कूल, मौजे केगाव, जि.सोलापूर<br>माध्यम मराठी<br>नवीन शाळा<br>माध्यमिक | महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे संचलित<br>विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>माध्यम इंग्रजी<br>नवीन शाळा<br>माध्यमिक |
| १३. | महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे | विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, सोलापूर | विश्वशांती गुरुकुल सी.बी.एस.ई.स्कूल, पंढरपुर संचलित,<br>विश्वशांती गुरुकुल सी.बी.एस.ई.स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर<br>माध्यम -मराठी<br>नवीन शाळा<br>उच्च माध्यमिक | महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे संचलित,<br>विश्वशांती गुरुकुल स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर<br>माध्यम- इंग्रजी<br>नवीन शाळा<br>उच्च माध्यमिक |